16741 - 55

जा.क्र.उमा१/कोवि/संमा/वेतन/१७/
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर
दिनांक- 21 JUL 2018

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर विभाग
अधीक्षक, वेतन व भ.नि.नि. पथक (माध्यमिक) कोल्हापूर विभाग

विषय- उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयांची सन २०१७-१८ चे संच मान्यतेनुसार सन २०१८-१९ मधील वेतन देयके स्वीकारणेबाबत

संदर्भ- १) मा. आयुक्त, शिक्षण यांचे पत्र क्र.आका/संचमान्यता/आस्था-ब(१२२)/३२०१ दि.१०/९/२०१५

२) या कार्यालयाची परिपत्रके दि. ३/१०/२०१६ व ६/५/२०१७ व दि. ३१/७/२०१७

३) कार्यालयीन मंजूर टिप्पणी दिनांक - २१/७/२०१८

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस सूचित करणेत येते की, या विभागातील ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांची अनुदानितकडील सन २०१७-१८ ची संच मान्यता पूर्ण झालेली आहे त्या शाळांची/कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता प्रती संबंधित शाळांकडे व वेतनपथकाकडे देणेत आलेल्या आहेत.. संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडून संच मान्यतेची वेतन पथकाची प्रत प्राप्त करुन घेणेत आलेली असलेच. त्यानुसार खालील सूचना विचारात घेवून त्यांची वेतन देयके पारित करणेत यावीत.

१) ज्या पूर्णवेळ / अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचा शालार्थ आयडी मंजूर झालेला असेल अशाच शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन देयक पारित करावयाचे आहे. याबाबत मा. शिक्षण संचालक व शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना विचारात घेवून कार्यवाही करावी. **शालार्थ आयडी नसलेल्या शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन काढता येणार नाही.**

२) सदर संच मान्यतेची प्रत व त्यासोबत मा. आयुक्त कार्यालयाकडून देणेत आलेल्या हमीपत्राची प्रत घेणेत यावी. (गतवर्षीप्रमाणे)संबंधित शाळेतील पूर्णवेळ मान्यताप्राप्त शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन काढणेत यावे. **( वाढीव मंजूर पदावरील मान्यता दिलेल्या परंतु वेतनास तरतूद नसलेल्या शिक्षण सेवक/शिक्षकांचे वगळून)**

**३) शासन निर्णयानुसार दोन ठिकाणची अर्धवेळ मिळून एका ठिकाणी पूर्णवेळ पदावर मान्यता देणेत आलेल्या शिक्षण सेवक/शिक्षकांचे बाबत-** संच मान्यता २०१७-१८ मध्ये दोन ठिकाणचे मिळून पूर्णवेळ मान्यता दिलेल्या कर्मचा-याचे दोन्ही ठिकाणी संबंधित विषयाचे अर्धवेळ पदे संच मान्यतेनुसार मंजूर असलेस अशा शिक्षकांचे पूर्वीप्रमाणे पूर्णवेळ मान्यता असलेल्या ठिकाणी वेतन काढणेत यावे. तथापि, याबाबत अशा दोन अर्धवेळ पदावरील शिक्षकास संस्थांतर्गत अन्यत्र बदलीने नियुक्ती देणेबाबतच्या सूचना संच मान्यतेमध्ये देणेत आलेल्या आहेत. त्यानुसार संबंधित शाळा/संस्था यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) सन २०१७-१८ च्या संच मान्यतेनुसार अर्धवेळ मंजूर पदावर जे अर्धवेळ शिक्षक /अर्धवेळ शिक्षक सेवक वेतन घेतले आहे व त्यांना सन २०१८-१९ साठी किमान ९ घडयाळी तास कार्यभार उपलब्ध आहे याची खात्री करुन अशा अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन प्राचार्य/ मुख्याध्यापक यांनी कार्यभाराबाबतचे व सेवासातत्याचे हमीपत्र वेतन पथकाकडे सादर करुन वेतन काढता येईल. अशा अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन देयक पारित करावे. **( काही न्यायालयीन प्रकरणे, उपलब्ध कार्यभार/पद यांचा विचार करता रयत शिक्षण संस्था व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था यांचे क.म.वि. मधील अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक यांचे अर्धवेळ पदावरील वेतन काढता येणार नाही. सदर संस्थामधील अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवकांचे वेतन सन २०१८-१९ च्या संच मान्यतेनंतर स्वतंत्र प्रस्ताव घेवून त्यांना वैयक्तिक मान्यता दिलेनंतर काढणेत यावे)**

५) सन **२०१७-१८** चे संच मान्यतेमध्ये मान्यता दिलेली नसेल अथवा अर्धवेळ शिक्षण सेवक मान्यता असेल व त्यानंतर वैयक्तिक आदेशाद्वारे अर्धवेळ वेतनश्रेणीत या कार्यालयाकडून मान्यता देणेत आली असल्यास अशा अर्धवेळ शिक्षकांचे अर्धवेळ वेतनश्रेणीतील शिक्षकाचे वेतन वरीलप्रमाणे कार्यभार व सेवासातत्याचे हमीपत्राचे आधारे काढता येईल. **यासाठी संबंधित शाळेच्या सन २०१७-१८ च्या संच मान्यतेमध्ये सदर विषयाचे अर्धवेळ पद कार्यभारानुसार मंजूर असणे व २०१८-१९ साठी कार्यभार उपलब्ध असणे आवश्यक राहील. (रयत व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था वगळून)**

**६) सन २०१०-११ पर्यंतची प्रस्तावित पदे शा.नि. दि. २१/५/२०१४ व २६/११/२०१४ नुसार मंजूर झालेली असलेने "अर्धवेळ मधून पूर्णवेळ" प्रस्तावित पदे मंजूर झाली आहेत यामुळे अर्धवेळची पायाभूत पदे**

**व्यपगत झालेली आहेत यामुळे अशा अर्धवेळ व्यपगत पदावरील वेतन काढता येणार नाही.** सदर पूर्णवेळ मंजूर पदावर नियुक्त कर्मचा-यांचे वैयक्तिक मान्यतेबाबतचे जे निर्णय होतील त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

७) या कार्यालयाकडून सदर वाढीव मंजूर पदावर जून २०१५ पूर्वी मान्यता देणेत आलेल्या **४४ पूर्णवेळ व ३१ अर्धवेळ कर्मचा**-यांचे वेतनास शासन पत्र दिनांक १८/३/२०१६ नुसार **"एप्रिल २०१५"** पासून वेतन अनुज्ञेय ठरवले आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

८) या कार्यालयाकडून जून/ऑगस्ट २०१६, एप्रिल २०१७ चे शिबीरामध्ये सन २००३-०४ ते २०१०-११ च्या वाढीव मंजूर पदावर नियुक्त शिक्षकांना **१०१** पदावरील **(मुददा क्र. ७ मधील ७५ पदे वगळून उर्वरीत)** मान्यता देणेत आलेल्या आहेत. सदर शिक्षकांच्या वेतनासाठी शासनाने तरतूद दिलेली नसलेने वैयक्तिक मान्यता आदेशावर यासंबंधिचे शेरे नमूद केले आहेत. (रबरी शिक्का आहे) अशा शिक्षकांची वेतन देयके काढणेत/पारित करणेत येवू नयेत. सदर वाढीव पदासाठी आर्थिक तरतूदीबाबतचे शासनाचे आदेश झालेनंतर त्याप्रमाणे अलहिदा कळविणेत येईल. (याची यादी स्वतंत्ररित्या पाठविणेत येईल). तसेच या १०१ पदावरील शिक्षण सेवक/शिक्षक यांचे शालार्थ प्रणालीसाठीचे प्रस्ताव विहित मार्गाने शिक्षण संचालनालयास सादर करुन मा. शिक्षण संचालक यांचेकडून शालार्थ आयडी मान्य झालेनंतरच अशा शिक्षण सेवक/ शिक्षकांचे वेतन अदा करता येईल.

९) सन **२०११-१२ ते २०१३-१४** या कालावधीतील प्रस्तावित पदे अदयाप मंजूर झालेली नसलेने सदर पूर्णवेळ प्रस्तावित पदापैकी जी अर्धवेळ पायाभूत पदे आहेत व त्यांना या कार्यालयाकडून सन २०१७-१८ चे संच मान्यता व वैयक्तिक मान्यतेद्वारे अर्धवेळ शिक्षक म्हणून मान्यता देणेत आलेली आहे. अशा कर्मचा-यांचे **अर्धवेळचे वेतन** कार्यभार व सेवासातत्य याच्या हमीपत्राद्वारे काढता येईल.

१०) कोणत्याही परिस्थितीत **शालार्थ आयडी** मंजूर नसलेल्या तसेच अर्धवेळ कार्यभार निकषानुसार देय ठरत नसलेल्या, मान्यता नसलेल्या कर्मचा-याचे वेतन काढले जाणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा याबाबतची वैयक्तिकरित्या संबंधित प्राचार्य/ मुख्याध्यापक यांना जबाबदार धरुन म.खा. शा. कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ व अन्य प्रचलित नियम व शासन निर्णयानुसार कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

११) अंशकालीन शिक्षकांची वेतन देयके - सन २०१७-१८ च्या संच मान्यतेमध्ये मान्यता दिलेले अथवा वैयक्तिक मान्यता दिलेल्या अंशकालीन शिक्षकांचे सन २०१७-१८ साठीचे वेतन काढणेत यावे. संबंधितांचे मान्यतेशिवाय वेतन देयके पारित करणेत येवू नयेत. सन **२०१८-१९** साठीचे अंशकालीन शिक्षकांचे वेतन त्यांचे सन **२०१८-१९** चे मान्यतेशिवाय काढता येणार नाही.

१२) सदरच्या सूचना या सन २०१७-१८ ची शिक्षक संच मान्यतेनुसार असून या कार्यालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सुरु राहतील.

(किरण लोहार)
प्र. शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
सर्व मान्यताप्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालये, कोल्हापूर विभाग

२/- वरील सूचनेनुसार पूर्णवेळ/ अर्धवेळ शिक्षकांचे दरमहाचे वेतन देयकासोबत प्राचार्य/मुख्याध्यापक यांचे हमीपत्र सादर करुन पात्र पूर्णवेळ/ अर्धवेळ शिक्षकांची वेतन देयके सादर करावीत. **शालार्थ आयडी मंजूर नसलेल्या पूर्णवेळ/अर्धवेळ शिक्षक/शिक्षण सेवक यांची वेतन देयके सादर करु नयेत.**

प्रत- माहितीस्तव सविनय सादर
१) मा. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे १
२) मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे १

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
३) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा
४) सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर
२/- उपरोक्त सूचनांचे अनुषंगाने या विभागातील आपल्या सर्व क.म.वि. ना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.